निवडणूक काळात माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची महत्वाची भुमिका : अपर जिल्हाधिकारी

बीड (प्रतिनिधी);- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंघाने आदर्श आचार संहिता लागु झाली असून या काळात माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणिकरणाचे महत्त्वाचे काम निवडणुकीच्या काळात केले जाते. त्सेच ही समिती शासनाचा नाक, कान, डोळे म्हणुन काम पाहते. या समितीचा एक भाग मीडिया कक्ष पण आहे त्याबाबतही आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. या दोन्ही समित्या अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षात राहतील. ३९ बीड मतदार संघामध्ये

चौथ्या टप्पात १३ मे ला निवडणुका होणार असून त्याबाबतची पूर्वतयारी सुरू करण्यात आलेली आहे. ज्या दिवसापासून आचारसंहिता लागू झाली त्या दिवसापासून बैठकीस उपस्थित होते. या समितीकडून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येणारा मजकूर / जाहिराती जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणिकरणाचे महत्त्वाचे काम निवडणुकीच्या काळात केले जाते. त्सेच ही समिती शासनाचा नाक, कान, डोळे म्हणुन काम पाहते. या समितीचा एक भाग मीडिया कक्ष पण आहे त्याबाबतही आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. या दोन्ही समित्या अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षात राहतील. ३९ बीड मतदार संघामध्ये

दोन्ही समितीच्या कामकाजालाही सुरुवात झाली. या अंतर्गत पत्रकारांना तसेच नागरिकांना मतदानाविषयी आणि एकूणच मतदान प्रक्रिवेविषयी जागरुक करण्याचे काम या समित्यांकडून टप्प्या टप्प्याने केले जाईल, असल्याचे डॉ. कुलकर्णी यावेळी म्हणाले. या समितीचे अध्यक्ष या निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे आहेत. यासह ३९ बीड मतदार संघाच्या करिता नेमण्यात आलेल्या समितीमध्ये अपर जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी बीड पोलीस निरीक्षक (सायबर) आकाशवाणी बीड केंद्राचे संचालक, जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी आणि सदस्य सचिव म्हणून जिल्हा माहिती अधिकारी काम करीत आहेत.

आज माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षात घेण्यात आली, त्या प्रसंगी ते बोलत होते. बैठकीस अपर जिल्हाधिकारी श्री. कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत ठेंडणकर, माहिती अधिकारी अंजु निमसरकर, पोलिस निरीक्षक सायबर विभाग देविदास गात, आकाशवाणी बीड केंद्राचे श्री काळोके, जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी भाऊसाहेब बांगर आज झालेल्या

लोकसेना राज्यात दहा जागा लढ़वणार- प्रा. इनामदार

बीड (प्रतिनिधी): लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणुकीमध्ये राज्यातून महाविकास आघाडीमे मुस्लिम समाजाला दहा जागा तुमच्याच पक्षातील पदाधिकारी यांना द्यावे अशी मागणी लोकसेनाने इंडिया गठबंधन यांच्याकडे केली होती परंतु या मागणीकडे चक्क दुर्लक्ष करण्यात आल्याने नाविलाज लोकसेना राज्यात लोकसभेच्या दहा जागेवर निवडणुक लढ़वणार आहे. व या विषयी राज्यातील इच्छुक उमेदवारांशी चर्चा व निवड सुरु अशर लवकरच यादी जाहिर करणार अशी माहिती लोकसेना प्रमुख डॅ. प्रा. इलियास इनामदार यांनी दिली आहे. निवडणूक मैदानात उतरण्याचे कारण ज्या कांग्रेस मित्रपक्षाला समाजाने सत्तर वर्षापासून सेक्युलर पक्ष म्हणून भरभरुन मते दिली त्या कांग्रेसने समाजाच्या अनेक समस्येकडे दुर्लक्ष केले जसे शिक्षण आरक्षण व संरक्षणा सारखे गंभीर विषय असतील व कधी समाजाला सतेत सामाऊन घेतले नाही, अनेक सेक्युलर नेते ईडीच्या भीतीने व निवडणूक टिकटच्या लालसेपोटी भाजपा मोदीच्या मांडीवर जाऊन बसलेले आपणास दिसेल. व दुसरीकडे भाजपाने देशात विकासाच्या नावाने फ़क्त जातीयवाद वाढवला स्विस बँकेतला काळा धन भारतात परत आणू व प्रत्येक भारतीयांच्या खात्यामध्ये पंधरा पंधरा लाख टाकू हे फ़क्त भाजपाची भपकेबाजी निवाली देशातील भ्रष्टाचार संपवणार भाजपा केंद्रीय तपास यंत्रणेच्या आडमधये मोठमोठाल्या उद्योगपती व राजकीय नेत्यांकडुन खंडणी वसूल करणारा पक्ष निघाला एलेक्ट्रोल बांड घोटाळा हा याचेच उदा. आहे आपण ऐकतो स्वच्छ प्रतिमेचे कैरैक्टर सर्टिफिकेट वाटणाऱ्या भाजपाने देशातील सर्व भ्रष्टाचारी नेत्यांना भाजपामध्ये प्रवेश देवून जणू भ्रष्टाचार पार्टीची स्थापना केली की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे विरोधकांना सपंवण्याचे कटकारस्थान भाजपाने केले आहे मोदी सरकार देशातील युवकांना करोडो रोजगार, नौकऱ्या देणार होती, मोफत शिक्षण देणार होती शेतकऱ्याचे कर्ज माफ करणार होती, महगाई कमी करणार होती परंतु याकडे लक्ष न देता भाजपाने फोडाफोडीचे राजकारण करुन देशातील राजकारण गढुळ व गलिच्च करुन टाकले आहे. देशातील जनतेने ठरवावे की आपल्याला मोदी सरकार हवे का? भारत सरकार हवे काय? देश कोणी एक व्यक्ती चालवत नाही देश संविधान, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व सामाजिक विचाराने चालतो परंतु नरेंद्र मोदी तानाशाही व हिटलरवादी धोरण राबवत आहे मग कशाला देशाला हुकूमशाह व अदानी अंबानीची भांडवलशाही पाहिजे सर्वांनी मिळून लोकशाहीचे भारत सरकार निवडून देवू असे राष्ट्रीय व सामाजिक आव्हान देशातील जनतेला लोकसेना प्रमुख डॅ. प्रा. इलियास इनामदार यांनी केले आहे.

संत तुकाराम महाराज बीज सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):- येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी संत महात्म्यांच्या आशिर्वादाने आणि वै.रामहारी बाबा) यांच्या संकल्पनेतून साकार झालेला भव्य दिव्य सांप्रदायाची परंपरा लाभलेला जगदूरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दि.२० ते २७ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४.०० ते ६.०० काकडा भजन, सकाळी ७.०० ते १०.०० गाथा पारायण, १०.०० ते १२.०० जगदूरू संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी २.०० ते ४.०० संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी ४.०० ते ५.०० ज्ञानेश्वरी प्रवचन, ५.०० ते ६.०० हरिपाठ, रात्री ९.०० ते ११.०० हरिकिर्तन होईल.मगळवार २६ .३ रोजी सायंकाळी निवृत्ती महाराज इदोरीकर. यांचे हरिकिर्तन होणार असून या सप्ताहाची सांगता बुधवार दि.२७ मार्च रोजी सकाळी भव्य दिव्य १०.०० ते १२.०० ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे जगदूरू संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त व बीजेच्या किर्तनाने होईल. त्यानंत महाप्रसाद होणार आहे. तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी वानगाव बोरगाव गोगलवाडी रौळसगाव यांनी केंले आहे.

प्रा.अशोक गायकवाड पद्मपाणी राज्यस्तरीय उत्कृष्ट सामाजिक, शैक्षणिक पुरस्काराने सन्मानित

उल्लेखनीय कार्याला मिळाला सन्मान

बीड, (प्रतिनिधी) –प्रा.अशोक गायकवाड यांना उत्कृष्ट सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले .त्यांनी नोकरी सोबतच धार्मिक,सामाजिक,शैक्षणिक या कार्यामध्ये स्वत:ला वाहून घेतले आहे.

२०१९ ला महामानव अभिवादन ग्रुप सूरू करून बीड शहरातील सर्व महामानवांच्या पुतळ्यांना दरोज पुष्पहार व अभिवादन ही प्रथम संकल्पना मांडली आहे.तसेच आदिवासी समीकरण, जिव्हाळा बेधर, इन्फंट इंडिया अशा अनेक ठिकाणी वेळो वेळी मदत केली आहे.मोफत शिकवणी वर्गाला मदत,प्रियदर्शी मोफत वाचनालय सुरू केले आहे.अनेक वेळा रक्तदान केले आहे त्याचबरोबर मणोत्तर देहदान केले आहे.अनेक गरजवंत बांधताना त्यांनी स्वखर्चातून मदत केली आहे. करोनाच्या काळामध्ये त्यांनी शंभर ते दीडशे कुटुंबाला स्वखर्चातून अन्नधान्य वाटप केले आहे. अनेक

विद्यार्थ्यांची फीस व त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक शाळांना शालेय साहित्य बोर्ड पुस्तक, वह्या वाटप केले आहे. विहार तिथे मोफत वाचनाल सुरू केले आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून चित्रकला स्पर्धा,निबंध स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर चे आयोजन करून बक्षीस वितरण केले आहे.बडिलांच्या स्मृती प्रत्यर्थ १००० बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाटप केले आहे. असे या चौफेर व्यक्तिमत्त्वाच्या प्रा.आशोक गायकवाड यांच्या कार्याची नोंद घेत पद्मपाणी प्रतिष्ठानकडून दिला जाणारा २०२३-२४ चा पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कर उद्योजक मा. विजयराजजी बंब तसेच मा. नानाभाऊ शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग जि.प.बीड, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष तथा पुरस्कार वितरण समारंभाचे उद्घाटक मा. बाबुरावजी पोटभरे, पद्मपाणी प्रतिष्ठांनचे संस्थापक दिलीप तरकसे,प्रा. डॉ.राणी जाधव, विभाग प्रमुख गढी महाविद्यालय,झुंजार नेता दै.उपसंपादक आत्मानाम वाव्हळ या सर्व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला या प्रसंगी पद्मपाणि प्रतिष्ठानचे संचालक, सभासद व पुरस्कर्ते तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते. राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रियदर्शी ट्रस्ट, महामानव अभिवादन ग्रुप बीड, स्ववंदीप शैक्षणिक सामाजिक विकास संस्था बीड. प्रियदर्शी मोफत वाचनालय बीड. तसेच मित्र परिवारांणी शुभेच्छा देऊन कौतुक केले आहे.

छोटेवाडी महोत्सवासाठी समिती गठीत

बीड, (प्रतिनिधी) : माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सार्वजनिक जयंती उत्सव समिती गठीत करण्यात आली. सदरील समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली. येत्या शनिवार दि.२०,२१,२२ एप्रिल २०२४ रोजी जयभिम महोत्सव साजरा केला जाणार आहे. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर महोत्सव उत्साहात पार पाडण्यासाठी नवनिर्वाचित पदाधिकारी, कार्यकर्ते तयारीला लागले आहेत.

बीडच्या जयभिम महोत्सवाने अक्ख्या राज्याला आदर्श घालून दिला आहे.अगदी त्याच धर्तीवर ग्रामीण भागातून छोटेवाडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महोत्सव एक आदर्श म्हावा यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्या अनुषंगाणे नियोजनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सामाजिक सलोखा कसा अबाधित राहील यासाठी चर्चात्मक नियोजन करण्यात आले. हा महोत्सव सर्वांचा असून एकजुटीने तो पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयभिम महोत्सव समिती गठीत करण्यात आली आहे.त्यामध्ये अध्यक्ष सुनिल डोंगरे, उपाध्यक्ष पवन शेरकर, सचिव आत्माराम दळवी, सदस्य नंदकिशोर पंडित, सदस्य सोनबा दळवी, सदस्य मचिंद्र दळवी, सदस्य दीपक दळवी, प्रसिद्धी प्रमुख प्रदिप दळवी, ग्राफिक डिझायनर राहुल दळवी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीला महापुरुष नगरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद वाहन चालक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र आमटे

बीड, (प्रतिनिधी) : येथील जिल्हा परिषद वाहन चालक संघटना जिल्हा बीड जिल्हा अध्यक्षपदी राजेंद्र आमटे यांची निवड झाली. याप्रसंगी माजी अध्यक्ष गोरे आणि संघटनेचे सचिव बाबठाणकर यांनी राजेंद्र आमटे यांचा सत्कार केला. राजेंद्र आमटे हे भारतीय सैन्यामध्ये १८ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाल्यानंतर बीड येथील जिल्हा परिषद आरोग्य विभागात तसेच जिल्हा परिषद प्रशासकीय कार्यालय अशा विविध ठिकाणी त्यांनी यापूर्वी शासकीय पदावर काम केलेले आहे आणि आता सध्या बीड जिल्हा परिषद वाहन चालक म्हणून कार्यरत आहेत म्हणून बीड जिल्हातील सर्व प्रशासकीय वाहन चालक यांनी बहुमताने आमटे यांची निवड केली.या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे. याचाच एक भाग म्हणून शासकीय वाहन चालक संघटनेच्या वतीने या स्वागत समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्याप्रसंगी विद्यमान सचिव एन.एफ नदान उपाध्यक्ष जुबेरी तसेच संघटनेचे विविध पदाधिकारी डोळे, सुस्कर, वडमारे, समीर पठाण, सुनील ढोकळे, महादेव बेद्रे, राजेंद्र मस्के, कलीम, राजू कुरकुटे, अनंत जोशी, जुबेरी, परदेशी, संतोष पोफळे यांनी आमटे यांचा स्वागत समारंभ कार्यक्रमानंतर एक बैठक घेऊन या संघटनेची पुढील वाटचालीच्या संदर्भात दिशा ठरविण्याच्या बाबतीत चर्चा केली. यामध्ये राजेंद्र आमटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या पुढील कालखंडामध्ये चालक व त्यांच्या परिवाराला तसेच आरोग्य विषयक काही अडचणी आल्या तर आपण त्या आपल्या संघटनेच्या मार्फत सोडवण्याचे काम करणार. तसेच चालकांच्या आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी यासारखे उपक्रम आपल्या संघटनेच्या मार्फत राबविण्यात येतील व आपण माझी या जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो तसेच यापुढेही मला आपले सर्वांचे सहकार्य राहू द्या कोणाच्याही अडचणीमध्ये मला काम करण्याची संधी मिळाली तर मी अडचण सोडवण्याचे काम तात्काळ करेल असे आश्वासन याप्रसंगी आपणा सर्वांना देतो आणि पुढील वाटचालीसाठी सर्वांना शुभेच्छा देतो असे त्यांनी याप्रसंगी मत व्यक्त केले.

आपला परिवार अनाथ वृद्धाश्रमाला पाणीटंचाईचा झळा

नेकनूर (प्रतिनिधी):- नेकनूर पासून पाच किमी अंतरावर असलेल्या कळंबंबर येथे गेल्या पाच वर्षापासून आपला परिवार अनाथ वृध्दाश्रम चालवण्यात येत आहे. शासकीय मदतीशिवाय फक्त समाजातील दात्यांच्या मदतीवरच हा आश्रम सुरु आहे. सध्या प्रकल्पात २५ आजी-आजोबा राहतात. तसेच प्रकल्पाच्या परिसरात ३०० पेक्षा जास्त फळझाडे लावलेली आहेत. उन्हाळा सुरु झाल्यामुळे मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बोअरचे पाणी आटले असून प्रकल्पात पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.आपला परिवार अनाथ वृध्दाश्रम प्रकल्पाचा दैनंदिन खर्च मोठा आहे. तो चालवीत असताना संचालकांना तोखरची कसरत करावी लागत आहे. त्यातच आता पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यामुळे प्रकल्प चालवताना मोठी आव्हाने उभा राहत आहेत. प्रकल्पातील लावलेली फळझाडे मोठ्या कष्टाने वाढवलेली आहेत. ती कोमेकून जात आहेत. यासह येथील कृपंगा दैनंदिन वापरासाठीही पाणी उपलब्ध नाही. बीड जिल्हा प्रशासनाने याठिकाणी टैंकर उपलब्ध करून द्यावे जेणेकरून उन्हाळ्याचे तीन महिने तरी सुकर जातील, अशी मागणी करण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडी शहर अध्यक्ष पदी पुनम ताई वाघमारे यांची निवड

बीड, (प्रतिनिधी) : आज दि.२०/०३/२०२४ बुधवार, रोजी राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष अजितदादा गट महिला आघाडीच्या काही महत्वाच्या नियुक्ती करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे, महिला प्रदेश अध्यक्ष रुपाली चाकणकर, बीडचे पालकमंत्री ना. धनंजयजी मुंडे यांच्या अध्यक्षतेनुसार तसेच बीडचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष प्रज्ञा खोसरे, विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर तालुकाध्यक्ष विजय पोकळे यांच्या नेतृत्वाखाली बीड च्या नामांकित

असणाऱ्या पुनम वाघमारे यांची बीड शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. वावेळी पुनम ताई यांनी महिलांचे रोजगाराचे प्रश्न सोडवण्याचा तसेच शहरातील महिलांच्या विविध शासनाच्या योजना बीड शहरामध्ये राबवण्याचे आश्वासन यावेळी पक्षश्रेष्टीना व महिलांना दिले.राष्ट्रवादी कांग्रेस अजितदादा गट यांच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडवण्याचा निर्धार यावेळी पुनम ताईने केला.सोबतच किरण जावळे यांना शहर सरचिटणीस, अर्चना देशमुख यांना शहर सचिव, तसलीम बेलदार यांना शहर कार्याध्यक्ष पदी नियुक्ती देण्यात आली. यावेळी रोजगार व स्वयंरोजगार पदाधिकारी रुपाली गायकवाड, रेखा खंडागळे, अनिता आधापुरे, व इतर सर्व उपस्थित होते.

चोवीस तास उलटले तरी पोलिसांना मुद्देमाल मिळाला नाही

गेवराई, (प्रतिनिधी):- मागिल दोन महिण्यापासून चकलांबा पोलिस ठाणे धुमधडाक्यात अवैध धंद्यांच्या विरोधात कडक कारवाया करत संपूर्ण बीड जिल्हात कारवाया करण्यात अव्वल ठरत आहे.तर दुसरीकडे तलवाडा व गेवराई पोलीस ठाणे छोट्या मोठ्या केलेल्या कारवाईचे सोशल मीडिया व वर्तमान पत्रातून श्रेय घेण्यातच मग्न ठरत आसल्याचे दिसुन येत आहे.आठवडी बाजारात जात असतांना पांगरी जवळ एका सराफा व्यापाऱ्याची सोने चांदीची बँग तिन आरोपीनी पळवली तसेच या चोरांना तलवाडा परिसरात मनूबाई जवळा याठिकाणी पकडण्यात आले होते.या प्रकरणी गेवराई पोलिसांत गून्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गेवराई पोलिस करत आहेत.तसेच चोबीस तास लोटूनही अद्यापर्यंत चोरुन नेलेला ऐवज सापडलेला नाही.मात्र पकडलेल्या व्यक्तींचे श्रेय घेण्यासाठी तलवाडा व गेवराई पोलीसांची एक प्रकारे स्पर्धा सुरु आसल्याचे दिसुन येत आहे.दरम्यान तलवाडा व गेवराई पोलीसांनी श्रेय घेण्याचे बाजूला ठेवून उर्वीरत आरोपी व मुद्देमालाचा तपास करण्याकडे लक्ष घालावे अशी मागणी होऊ लागली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,गेवराई पोलीस ठाणे हद्दीत पांगरी जवळ माळहिवरा फाट्यावर एका सराफा व्यापा-याला स्कॉर्पिओने धक्का मारून त्यांच्याकडील असणारी सोने व चांदीची बँग हिसाकाऊन आरोपी पसार झाले होते.तलवाडा हद्दीत मनुबाई जवळ्याजवळ या आरोपीना पोलिसांना पकडले परंतू तलवाडा आणि गेवराई पोलिसांत याबाबत श्रेय घेण्यासाठी एक प्रकारे श्रेययुद्ध तलवाडा व गेवराई या दोन्ही पोलिस ठाण्याचे प्रमूख आपआपल्या परीने आपली पाठ थोपटून घेण्यात मग्न आहे.परंतू तिन आरोपी एक सिल्हर रंगाची स्कॉर्पिओ सह आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले.माव या गून्हात चोरीला गेलेला लाखोंचा ऐवज मिळून आला नाही ही शोकांतिका आहे.श्रेयवादातच दोन्ही ठाण्याचे ठाणेदार मग्न आसल्याचे दिसुन येत आहे. पकडलेल्या तीनही आरोपीना गेवराई न्यायालया समोर हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून पूढील तपास सपोनि कोठकर हे करत आहेत.

अबॅकस जागतिक ओलंपियाड चॅम्पियनशिपमध्ये सांची रोहन कांडेकरने मिळवली मेटल ट्रॉफी

बीड (प्रतिनिधी) अबॅकसमुळे माझ्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आणि सर्वोत्कृष्ट बौद्धिक व्यवहारिक, कलात्मक,समन्वयक असा सर्वांगम विकास झालेला आहे. असे जागतिक सर्वोत्कृष्ट मानांकन मिळवणाऱ्या सांची रोहन कांडेकरच्या पालकांचे आनंदग्रिव असे गौरव उद्गार निघालेले आहेत . विविध स्पर्धेमधूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना शैक्षणिक वातावरण निर्मिती करून देणे आवश्यक आहे , शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मागनि अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. सांची रोहन कांडेकरने जागतिक स्तरावरील आयनबमो आणि आय एम एम ओ अबॅकस ओलंपियाड चॅम्पियनशिपमध्ये सर्वोत्कृष्ट रैंकिंग मिळवून ऐतिहासिक यश मिळवलेले आहे. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात.

जागतिक स्तरावरील २२ देशांपेक्षा जास्त सहभाग असणाऱ्याया आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटनेद्वारे अबॅकस चॅम्पियनशिपचे नोव्हेंबर -डिसेंबर २०२३ पासून चार फेब्रुवारी २०२४ या कालावधीत तीन वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये सिलेक्शन करण्यात आलेले होते. सर्व टप्प्यांमध्ये सांची रोहन कांडेकरने आऊट ऑफ रैंकिंग मिळवून जागतिक सर्वोत्कृष्ट क्रमांक अबॅकस लेवलमध्ये मिळवलेला आहे. रशिया, कजाकिस्तान, तर्की, दुबई, यूएसए, यु ॲंड इ भारतासह, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार, श्रीलंका, न्युझीलँड, पनामा, इंडोनेशिया अशा जगातील दोन हजार विद्यार्थ्यांपैकी सहभाग असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सांची रोहन कांडेकरने सर्वोत्कृष्टक्रमांक मिळवल्यामुळे त्याची रशिया येथे एप्रिल २०२४ महिन्यात होणाऱ्या ऑफलाइन जागतिक अबॅकस ओलंपियाडसाठी सुद्धा निवड करण्यात आलेली आहे. सांची रोहन कांडेकर गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे तसेच तिच्या पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस तथा वैदिक गणित मार्गदर्शक डॉ.एस ए घोडके यांनी सांचीला सतत गणिता मधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून सांची रोहन कांडेकर , आई-वडिलांचे हार्दिक अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. रशिया किंवा टर्की या देशांमध्ये होणाऱ्या जागतिक स्तरावरील एप्रिल २०२४ जागतिक ऑफलाइन अबॅकस ओलंपियाड निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

अबॅकस आणि वैदिक मॅथमुळे विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे.